देशोन्नती दि. 1. 8. 25

# पोलिस अधीक्षकांच्या मास रेड कारवाई अंतर्गत साडे तीन लाखांचा मुद्देमाल जप्त

देशोन्नती वृत्तसंकलन



**नांदेड :** जिल्हयातील अवैध दारू, हातभट्टी दारू निर्मिती व विक्री करणाऱ्या इसमांवर मास रेडचे आयोजन करून एकूण ३ लाख ४९ हजार ४५० रूपयाचा मुद्देमाल जप्त केला.

जिल्हयातील अवैध व्यवसाय पुर्णतः बंद करण्यासंबंधाने पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सूरू केलेल्या ऑपरेशन फ्लॅश आऊट अंतर्गत जिल्हयातील अवैध दारू, हातभट्टी दारू निर्मिती व विक्री करणाऱ्या इसमांविरूध्द कारवाई करण्यात आली. पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी ३१ रोजी मास रेडचे आयोजन केले होते. सदर मास रेड कामी अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, सुरज गुरव यांच्यासह सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा येथील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार तसेच सर्व ठाण्याचे प्रभारी अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी भाग घेतला होता. राबविलेल्या या मोहीमेमध्ये जिल्ह्यात एकुण ६३ गुन्हे दाखल करून एकुण ६५ आरोपीतांवर कारवाई करत एकुण ३ लाख ४९ हजार ४५० रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.